महासत्ता एकच आवृत्ती
08 MAY 2024
महासत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आता बारावीनंतरही शिक्षणाची संधी

कोल्हापूर ता.७ (प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०ची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्यात येत असून या धोरणाच्या अनुषंगाने येत्या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतर पदवी स्तरावरील अनेक महत्त्वाचे नवे अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करण्यात येत आहेत. त्या अभ्यासक्रमांची माहिती देण्यासाठी विद्यापीठाने येत्या गुरुवारी (दि. ९ मे) सायंकाळी ५ वाजता येथील दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवन येथे स्कूल कनेक्ट अभियान' आयोजिले आहे.

शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन आणि मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठामध्ये बहुतांश अभ्यासक्रम हे पदव्युत्तर स्तरावरील आहेत. महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठात प्रवेश घेता येत असे. काही वर्षांपूर्वीपासून विद्यापीठात बी.टेक. अभियांत्रिकीचे अभ्यासक्रम तंत्रज्ञान अधिविभागात सुरू आहेत. त्यानंतर स्कूल ऑफ नॅनो-सायन्स अँड टेक्नॉलॉजीअंतर्गत बी.एस्सी.-एम.एस्सी. नॅनोसायन्स (पाच वर्षे एकात्मिक) अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. या दोन्ही अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत विद्यापीठांना नवीन व अद्यावत अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे. या धोरणाला सकारात्मक प्रतिसाद देताना शिवाजी विद्यापीठाने आता २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतरचे पदवीस्तरीय अनेक अभ्यासक्रम सुरू करण्याचे योजिले आहे. यामध्ये उपरोक्त दोन्ही अभ्यासक्रमांखेरीज बी.ए. स्पोर्ट्स, बी.ए. फिल्म मेकिंग, बी.कॉम. बँकिंग अँन्ड फायनान्स, बी.एस्सी.-एम.एस्सी. इकॉनॉमिक्स(पाच वर्षे एकात्मिक), बी.सी.ए., बी.एस्सी.-एम.एस्सी. (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग), बी.एस्सी.-बी.एड.(चार वर्षे एकात्मिक) आणि एम.बी.ए. (एकात्मिक चार वर्षे) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. याबरोबरच विद्यापीठाच्या ऑनलाईन व दूरस्थ शिक्षण केंद्रामार्फतही ऑनलाईन एम.बी.ए. सह इतरही अनेक महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत.

या सर्व अभ्यासक्रमांची इच्छुक विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांना सविस्तर माहिती देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या वतीने स्कूल कनेक्ट अभियान' हाती घेण्यात आले आहे. या अभियानांतर्गत येत्या ९ मे रोजी सायंकाळी ५ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन येथे विशेष मार्गदर्शन शिबीर आयोजिले आहे. यामध्ये विद्यापीठातील त्या त्या विषयांचे तज्ज्ञ, अभ्यासक्रम समन्वयक आणि अधिविभागांचे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे शंकासमाधानही करतील. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर स्कूल कनेक्ट अभियान संपन्न होत असून विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. महाजन व डॉ. देशमुख यांनी केले.

0 8 MAY 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमा भागातील ८६५ गावांतील विद्यार्थ्यांना मिळणार मोफत प्रवेश

## शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम; प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन सोय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी मोफत, सवलत प्रवेश योजना राबविण्यात येणार आहे. याचा ८६५ मराठी भाषिक गावांतील विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी मोफत-सवलत प्रवेश योजना विद्यापीठाने जाहीर केली आहे. विद्यापीठ परिसरातील सर्व अभ्यासक्रमांसाठी संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ, तर विनाअनुदानित अभ्यासक्रमासाठी २५ टक्के शुल्क माफ सवलत देण्यात येणार आहे. त्याचबरोबर वसतिगृहासाठी पूर्णतः फी माफ करण्यात आली आहे.

दि. ८ मे रोजी देवचंद महाविद्यालय (निपाणी), छत्रपती शिवाजी महाराज कॉलेज भालकी (जि. बिदर), शिवस्मारक स्थळ (खानापूर) व संत तुकाराम महाराज सांस्कृतिक भवन, खानापूर रोड, बेळगाव येथे प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याठिकाणी विद्यापीठाने दिलेल्या विहीत वेळेत विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 MAY 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठातर्फे 'स्कूल कनेक्ट अभियाना'चे आयोजन

कोल्हापूर । शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०ची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्यात येत असून, या धोरणाच्या अनुषंगाने येत्या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतर पदवी स्तरावरील अनेक महत्त्वाचे नवे अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करण्यात येत आहेत. त्या अभ्यासक्रमांची माहिती देण्यासाठी विद्यापीठाने गुरुवार, दि. ९ मे रोजी सायंकाळी ५ वाजता दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवन येथे स्कूल कनेक्ट अभियानाचे आयोजन केले आहे.

विद्यापीठामध्ये बहुतांश अभ्यासक्रम पदव्युत्तर स्तरावरील आहेत. मात्र, काही वर्षांपूर्वीपासून विद्यापीठात बी. टेक. अभियांत्रिकीचे अभ्यासक्रम तंत्रज्ञान अधिविभागात सुरू आहेत. त्यानंतर स्कूल ऑफ नॅनो-सायन्स अँड टेक्नॉलॉजीअंतर्गत बी.एस्सी.-एम.एस्सी. नॅनो सायन्स (पाच वर्षे एकात्मिक) अभ्यासक्रम सुरू करण्यात आला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत विद्यापीठांना नवीन व अद्ययावत अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतरचे पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू करण्याचे योजिले आहे. यामध्ये बी. ए. स्पोर्टस, बी.ए. फिल्ममेकिंग, बी.कॉम. बँकिंग अँड फायनान्स, बी.एस्सी.-एम. एस्सी. इकॉनॉमिक्स (पाच वर्षे एकात्मिक), बी.सी.ए., बी. एस्सी.-एम.एस्सी. (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग), बी. एस्सी.-बी.एड. (चार वर्षे एकात्मिक) आणि एम.बी.ए. (एकात्मिक चार वर्षे) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. याबरोबरच विद्यापीठाच्या ऑनलाईन व दूरस्थ शिक्षण केंद्रामार्फतही ऑनलाईन एमबीएसह इतरही अनेक महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम राबवण्यात येत आहेत. या सर्व अभ्यासक्रमांची माहिती देण्यासाठी विद्यापीठातर्फे 'स्कूल कनेक्ट अभियान' हाती घेण्यात आले आहे.

# सीमावासीयांसाठी शिवाजी विद्यापीठाची सवलत

## अभ्यासक्रमानुसार वर्गवारी : उद्या देवचंद महाविद्यालयात कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

निपाणी, ता. ७ : महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या सीमाभागातील ८६५ गावांतील विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षांपासून शिवाजी विद्यापीठाने प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही अभ्यासक्रमांसाठी मोफत व काही ठिकाणी फी सवलत योजना लागू केली आहे. यंदाही म्हणजे २०२४-२५ सालात विद्यापीठाने मोफत आणि सवलतीची योजना जाहीर करून सीमाभागातील इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

योजनेसाठी नियुक्त केलेल्या कमिटीकडून निपाणीसह सीमाभागात भालकी, खानापूर व बेळगाव



याठिकाणी कार्यशाळा घेऊन पालक, विद्यार्थ्यांसह शिक्षणप्रेमींमध्ये याबद्दल जागृती केली जाणार आहे. प्रारंभी गुरुवारी (ता. ९) अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयात सकाळी ११.३० वाजता निपाणी भागातील विद्यार्थी, पालक, शिक्षणप्रेमींसाठी कार्यशाळा होत आहे. त्यानंतर भालकी, खानापूर, बेळगाव येथे मेळावे होतील. त्याचा कार्यक्रम शिवाजी विद्यापीठाने जाहीर केला आहे. विशेष म्हणजे कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून सीमावासीयांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

सीमाभागातील ८६५ गावांतील विद्यार्थ्यांचा सीमाभागात नोकरी आणि शैक्षणिक प्रश्न नित्याचा आहे. येथील विद्यार्थ्यांच्या समस्येची दखल घेत विद्यापीठाने सीमाभागासाठी ही विशेष योजना अमलात आणली आहे. त्याला मागील दोन वर्षांत सीमाभागातील विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद लाभला. योजनेंतर्गत अनुदानित अभ्यासक्रमांसाठी मोफत व विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी २२ टक्के शुल्क माफ करण्यात आले आहे. जे विद्यार्थी वसतिगृहासाठी प्रवेश घेऊ इच्छितात त्यांच्याकरीता वसतिगृहाची फी माफ केली जाईल. २०२४-२५ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असून ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा आहे अशा अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा लवकरच घेतली जाणार आहे. त्यासाठी अर्ज करण्यासाठी मुदत दिली जाणार आहे. सीमाभागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

**विद्यापीठाने चार ठिकाणी जाहीर केलेला कार्यशाळेचा कार्यक्रम असा**

| शहर | स्थळ | तारीख व वेळ |
|---|---|---|
| निपाणी | देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर | ९ मे २०२४, स. ११.३० |
| भालकी | छत्रपती शिवाजी महाराज कॉलेज | १३ मे २०२४, स. ११.३० |
| खानापूर | शिवस्मारक स्थळ | १४ मे २०२४, स. १०.३० |
| बेळगाव | संत तुकाराम महाराज सांस्कृतिक भवन, खानापूर रोड | १४ मे २०२४, दु. ३.०० |

"दोन वर्षांपासून महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील विद्यार्थ्यांसाठी सवलतीची योजना राबवली आहे. त्याला सीमाभागातून चांगला प्रतिसाद लाभत आहे. गुरुवारी देवचंद महाविद्यालयात कार्यशाळा आयोजित केली आहे. कार्यशाळेस विद्यार्थी, पालक, शिक्षणप्रेमींनी उपस्थित राहावे.

**-डॉ. जगन कराडे**, सवलत कमिटी सदस्य, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### कार्यशाळा खुली

योजनेच्या जागृतीसाठी आयोजित कार्यशाळेत पालक, विद्यार्थी, शिक्षणप्रेमींना सीमावासीयांसाठी असणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. यामुळे कार्यशाळा सर्वांसाठी खुली आहे. कार्यशाळेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवाजी विद्यापीठाने केले आहे.